नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 17/02/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर तुरकमारी येथे दिनांक 11/02/2021 चे 17.00 वा. ते दिनांक 16/02/2021 चे 13.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– कमलेश लालदास सुखदेवे वय 35 वर्ष रा. प्लॉट क्र. 55 ड्रिम कॉलनी तुरकमारी हे त्यांचे पत्नीसह डीलीव्हरी करीता हिंगणघाट येथे गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घरातील मागील दाराची कडी काढुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी आलमारीमध्ये ठेवलेले नगदी 5,000/– रू., एकुण 37 ग्रॅम सोन्याचे दागीने किंमती 55,000/– रू., एकुण 7 तोडे चांदीचे दागीने किंमती 7,000/– रू. व एक टायटन कंपनीची घडयाळ किंमती 2,000/– रू. असा एकुण 69,000/– रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/मोरखडे मो.क्र 8208751249 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. रामटेक :– दि. 15/02/2021 चे 18:00 वा. ते दि. 16/02/2021 चे 10.00 वा. चे सुमारास फिर्यादी – मनोहर गणपत मस्के, वय 36 वर्ष, रा. हमलापुरी नगरखन व शेजारी राहणारा ईसम हे लग्नासाठी बाहेर गावी गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादी व शेजारी राहणारे यांचे घराचे दरवाज्याची कुंडी तोडुन घराचे आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने आलमारीत ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 35,000/–रू. व नगदी 10,200/– रू. तसेच शेजारील 3 चांदीचे सिक्के किंमती 5,000/– व नगदी 2,500/– रू असा एकुण कि. 52,700/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ सदाशिव काठे 9011326793 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर